Impact Factor - 6.261

ISSN - 2348-7143

UGC Approved Journal No.40705 University Grants Commission

INTERN!TION!L RESE!RCH FELLOWS !SSOCI!TION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-research Journal**

**PEER REFREED & INDEXED JOURNAL**

**April -2019**

**SPECIAL ISSUE-**

# कर्तृत्व परंपरेचा उदय व अस्त



**Executive Editor:**
Prof. Virag Gawande
Director,
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Guest Editor**
Dr.Manisha S.Yadav
Hod-Political Science
Shri Gadge Maharaj Mahavidyalaya,
Murtijapur. Dist -Akola [M.S.]

**Chief Editor**
Mr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV's Arts & Commerce College
Yeola, Dist - Nashik [M.S.] INDIA

RESEARCH JOURNEY
MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL RESEARCH JOURNAL

**This Journal is indexed in :**

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- Universal Impact Factor (UIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) – 6.261, (GIF) –0.676 (2013)
Special Issue
UGC Approved No. 40705
ISSN : 2348-7143
April 2019

तसेच सक्तीने वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडणे. या पध्दतीवर बंधने आली आहेत. धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकारही स्त्रीला स्वतःच्या इच्छेने कोणत्याही धर्माचा आचार प्रचार व प्रसार करण्यास मोकळीक देत असल्याने ती स्वःइच्छेने आध्यात्मिक प्रतिष्ठा जपू शकते. शैक्षणिक व सांस्कृतिक अधिकारामूळेही महिला सक्षमीकरणास मोठा हातभार लावलेला दिसून येतो. या अधिकारामुळे सर्व जाती धर्मातील महिलांना शिक्षण घेण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. संविधानात्मक, उपाययोजनांच्या अधिकारामुळे भारताचा नागरीक असलेली प्रत्येक महिला आपल्यावर झालेल्या अन्यायाविरूध्द न्यायालयात दाद मागू शकते आणि सन्मानाचे व प्रतिष्ठेचे जीवन जगू शकते.

**मार्गदर्शक तत्त्वे व महिला सक्षमीकरणः**

भारतीय राज्यघटनेच्या चौथ्या भागात कलम ३६ ते ५१ मध्ये राज्याच्या धोरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश केला आहे. संविधातातून काय साध्य करावयाचे आहे हे उद्दीष्टांच्या स्वरूपात उद्देशपत्रिकेत नमूद करण्यात आले आहे. ही उद्दीष्ट्ये साध्य करण्यासाठी राज्यकर्त्यांनी कशाप्रकारे धोरणे ठरवावी व कशाप्रकारे राज्य कारभार करावा हे सांगण्याकरीता संविधानकारांनी काही मार्गदर्शक तत्वे निश्चित केली आहेत. राज्यकर्त्याचे धोरण संविधानातील मुख्य उद्दीष्टांपेक्षा वेगळे असू नये यासाठी ही मार्गदर्शक तत्वे राज्यकर्त्यांना मार्गदर्शन करतात. या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये काही तत्त्वे महिलांना सक्षम करण्यासाठी मार्गदर्शन करणारी आहेत. जसे की सर्व स्त्री- पुरूषांना समान कामासाठी समान वेतन प्राप्त होईल अशी व्यवस्था करावी. या मार्गदर्शक तत्त्वाने पुरूषाप्रमाणेच महिलांना समान दर्जा दिला आहे. त्यामुळे पारंपारीक समाजात स्त्रीला दुय्यम मानून तिच्या कामासही दुय्यम म्हणण्याची प्रवृत्ती या मार्गदर्शक तत्त्वांच्या अंमलबजावणीमुळे नष्ट झाली आहे. दुसरे म्हणजे मार्गदर्शक तत्त्वांमध्ये १४ वर्षांपर्यंतच्या सर्व मुला-मुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची व्यवस्था शासनाने करावी असे नमूद केल्यामुळे पुरूषांबरोबरच महिलांच्या साक्षरतेच्या प्रमाणात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. विशेषतः या मार्गदर्शक तत्त्वाला अनुसरून शिक्षणाचा अधिकार मुलभूत अधिकारात समाविष्ट करण्यात आला आहे. त्यामुळेही महिलांचे साक्षरतेचे प्रमाण वाढत आहे. भारतातील साक्षरतेचे प्रमाण वाढविण्याकरीता स्वातंत्र्योत्तर काळात अनेक प्रयत्न करण्यात आले आणि आजही करण्यात येत आहेत. या प्रयत्नांमध्ये मूलांबरोबरच मूलींच्या साक्षरतेचे प्रमाण वाढावे म्हणून विशेष प्रयत्न होतांना दिसतात जसे की, मुलींना मोफत बसेच पास, मोफत वसतीगृहे इ. त्यामुळे महिलांच्या साक्षरतेचा आलेख निश्चितच वाढत आहे. साक्षरतेमुळे महिलांच्या बुध्दीमत्तेचा विकास होत आहेच शिवाय त्यांना त्यांच्या अधिकारांचीही जाणीव होत आहे. शिक्षणामुळे महिलांना स्वतःच्या कुवतीची जाणीव होवून त्या प्रत्येक क्षेत्रात सक्षमतेने पुढे येत आहेत आणि यशस्वीपणे आपले काम करीत आहेत.

**आरक्षण धोरण व महिला सक्षमीकरणः**

राजकीय स्वरूपाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी पंचायत राज्यव्यवस्था स्थापन करण्याचे धोरण ठरविण्यात आले आहे. त्यानुसार भारतीय राज्यघटनेच्या ७३ व्या घटना दुरूस्तीनुसार देशात पंचायत राज्यव्यवस्था ही संकल्पना कार्यान्वित केल्या गेली. या घटना दुरूस्तीमुळे महिलांना जिल्हा परिषदा, पंचायत समिती व ग्रामपंचायतीमध्ये ३३ टक्के आरक्षण मिळाले. या घटना दुरूस्तीची सर्वात प्रथम अंमलबजावणी महाराष्ट्र शासनाने सुरू केली. याचा आधारावर केंद्रीय संसदेमध्ये व राज्य विधीमंडळामध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण मिळावे यासाठी विधेयक तयार केले होते, मात्र अनेक राजकीय पक्षांचा या विधेयकाला विरोध होता. अलिकडच्या काळात अनेक राज्य सरकारनी आपल्या राज्यात पंचायत स्तरावर महिलांना ५० टक्के आरक्षण दिले आहे. त्यामध्ये आसाम, आंध्रप्रदेश, बिहार, छत्तीसगड, गुजरात, हिमाचल प्रदेश, झारखंड, केरळ, कर्नाटक, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, ओडीसा, राजस्थान, सिक्कीम, पश्चिम बंगाल या राज्यांचा समावेश आहे. महिला आरक्षण धोरणांच्या वरील तरतुदींमध्ये महिला सक्षमीकरणात निश्चितीच भर पडत आहे. पुरूष प्रधान संस्कृतीत कुवत आणि क्षमता असूनही अनेक महिला घराबाहेर पडू शकत नव्हत्या त्यांना या तरतुदींनी स्वतःला सिध्द करून दाखविण्यासाठी दालने उघडी करून दिली आहेत असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. पंचायतराज मधील महिला आरक्षण धोरणामुळे महिला समाजकारण व राजकारणात पुढे आल्या आणि वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये त्यांनी वेगवेगळी कार्ये पार पाडली आहेत. उदा. दारूबंदी, हूंडाबंदी, महिला अत्याचाराविरूध्द बंड, महिला सक्षमीकरण त्याचप्रकारे सामाजिक स्तरावर वेगवेगळया प्रकारच्या संस्था, संघटना, परिषदा व शिबिर या माध्यमातून व स्त्री जनजागृती करण्याचे महान कार्यही महिलाच करीत आहेत.

अशाप्रकारे मुलभूत हक्क व मार्गदर्शक तत्त्वांच्या माध्यमातून महिलांना सक्षम करण्यासाठी अनेक तरतुदी करण्यात आल्या आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सार्वत्रिक प्रौढमताधिकाराचे तत्व स्विकारून महिलांनाही मतदानाचा हक्क व राजकारणात सहभागी होण्याचा हक्क समप्रमाणात प्राप्त झाला आहे. वरील सर्व तरतुदींना व्यावहारीक आधार देण्यासाठी पं. नेहरूंच्या पहिल्याच सरकारने महिलांसाठी अनेक कायदे केले. त्यात विशेष महत्त्वाचे म्हणजे विशेष विवाह कायदा, १९५४, हिंदु

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (CIF) - 3.452, (SJIF) - 6.261, (GIF) -0.676 (2013)
Special Issue | April 2019
UGC Approved No. 40705

विवाह कायदा १९५५, हिंदू दत्तक कायदा १९५६, स्त्रिची अनैतिक व्यापारबंदी १९५६, हूंडा बंदी कायदा १९६१ हे कायदे आहेत. त्याचबरोबर महिला उन्नतीसाठी अनेक स्त्रिचळवळी सुध्दा निर्माण झाल्यात व त्यांनी भारतीय स्त्रीला 'चुल आणि मूल' या चौकटीच्या बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. आज अनेक महिला महत्त्वपूर्ण पदावर कार्यरत आहेत. किरण बेदी (प्रशासक), किरण मुजूमदार (उद्योजक), मेधा पाटकर (सामाजिक कार्यकर्त्या), सुनिता नारायण (पर्यावरण तज्ञ) ही यादी न संपणारी आहे, शिवाय राजकारणातही महिलांचा सहभाग वाढत आहे. अनेक राज्यात महिला मुख्यमंत्री राहील्या आहेत. तामीळनाडूमध्ये जयललीता, उत्तरप्रदेश मध्ये मायावती, राजस्थानमध्ये वसुंधरा राजे, प. बंगाल मध्ये ममता बॅनर्जी, दिल्लीमध्ये शिला दिक्षीत इ.

महिलांचा मतदान करण्याच्या प्रमाणाचा आलेखही वाढता आहे. १९९१ मध्ये स्त्रीयांच्या मतदानाचे प्रमाण ५१.४ टक्के होते ते सन १९९९ च्या निवडणूकात ५७.९ टक्के पर्यंत पोहचले. पंचायत राज व्यवस्थेतील महिला आरक्षण धोरणामुळे स्थानिक पातळीवरील महिलांच्या दर्जातही सुधारणा होत आहे. ग्रामीण भागातील अनेक महिला ग्राम पंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद सदस्या बनल्या आहेत. अनेक महिला सरपंच व सभापती बनल्या आहेत. त्यामुळे महिलांना ग्रामविकास करण्याची व सोबतच नेतृत्व करण्याची संधीसुध्दा मिळाली आहे. प्रतिनिधीत्त्वाची हमी मिळाल्याने महिलांचे राजकीय सामाजिकरण होण्यास सुरूवात झाली आहे. राजकीय सामाजिकरण शिक्षणाचा वाढता प्रसार आणि मुलभूत हक्कांची हमी यामुळे महिला सबलीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे. साक्षरता प्रसार व पंचायतराज मधील आरक्षणामुळे महिलांचा राजकारण व समाज कारणातील सहभागीता वाढत आहे. दारूबंदी, हूंडाबंदी, जाचक रूढी परंपराविरूध्दचा लढा अशा अनेक बाबींनी त्यातून जन्म घेतला आहे. राजकारण व समाजकारणातील महिलांची सहभागीता भारताच्या सामाजिक व राजकीय आधुनिकरणाचा एक भाग आहे.

**संदर्भ सूची:**

१) पाटील, डॉ. वा.भा., पंचायत राज, प्रशांत पब्लिकेशन, जळगांव, २००९
२) गवई डॉ. सुभाष, चव्हाण, डॉ. शांताराम : भारतीय संविधानातील तरतुदी आणि स्थानिक स्वराज्य संस्था, प्रशांत पब्लिकेशन जळगांव, २०१७.
३) सिंह, राजबाला, मानवाधिकार और महिलाएँ, अविष्कार पब्लिशर्स, डिस्ट्रीब्युटर्स, जयपुर, २००६.
४) आंबेडकर डॉ. भिमराव रामजी, भारताचे संविधान भारत सरकार विधी व न्याय मंत्रालय, सारनाथ प्रकाशन बुक डेपो, परभणी, डिसेंबर २०१२.
५) जैन डॉ. पृथ्वीराज, फडिया, डॉ. बी.एल. भारतीय शासन एवं राजनिती, साहित्य भवन पब्लिकेशन, आगरा, २०१०.
६) देशमुख डॉ. अलका, भारतीय शासन आणि राजकारण, श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर, २००३.
७) Kashyap, Subhash C, - Our Constitution, National Book Trust, India, १९९४.